# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक ८ जुलै, २०२५
## (सकाळी ०९.४५ ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(गुरुवार, दिनांक ३ जुलै, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक - १ व २)**

**(१) श्री. अभिमन्यु पवार, ॲड. राहूल कुल, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात गावापासून दूरच्या अंतरावर असलेल्या वस्ती, पाडे, तांडे, वाड्यावरील मुलांना प्राथमिक शिक्षण वस्तीवरच उपलब्ध व्हावे यासाठी राज्यातील जवळपास २५०० वस्तीशाळा राज्य शासनाने २००१ पासून सुरु केल्या असणे, सदरील वस्तीशाळेवर ग्रामपंचायतीच्या शिफारशीनुसार गावातील शिक्षित उमेदवारांची नियुक्ती शिक्षण विभागाने केली असणे, सदरील वस्तीशाळांचे रूपांतरण ही जि.प.प्रा. वस्तीशाळा असे नामकरण करून त्याठिकाणी द्वी शिक्षकीय शाळा म्हणून मान्यता देण्यात येणे, सदरील शाळेच्या इमारतींचे बांधकाम जि.प. च्या माध्यमातून पूर्ण झाले असणे, वस्तीशाळा शिक्षक अत्यल्प मानधनावर कार्यरत असल्याने त्यांची उपासमार होत असल्याने या वस्तीशाळा शिक्षकांना डी.टी.एड. चे शिक्षण देऊन त्यात उत्तीर्ण शिक्षकांना शासनाने सन २०१४ मध्ये सेवेत कायम केले असणे, अनेक शिक्षक हे सेवानिवृत्त झाले असणे, सदरील वस्तीशाळा शिक्षक यांनी अत्यल्प मानधनावर २००१ पासून २०१४ पर्यंत शिक्षण देण्याचे काम केले असल्याने त्यांची सदरील कालावधीतील सेवा ग्राह्य धरून जुनी पेन्शन योजना व चटोपाध्याय वेतनश्रेणी लागू करण्याबाबत या शिक्षकांची सातत्याने मागणी असणे, सदरील शिक्षकांची २००५ पूर्वीची नियुक्ती असल्याने सदरील शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(२) डॉ. विनय कोरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील पाणीपुरवठा संस्थांची कर्ज माफ करण्याची घोषणा माननीय राज्यपाल महोदयांनी त्यांचे अभिभाषणात हिवाळी अधिवेशन, २०२४ मध्ये केलेली असणे, तथापि सदर घोषणेप्रमाणे सहकार खात्याकडून कर्ज माफ केलेचा शासन निर्णय पारित न होणे, तसेच अंतिम मंजुरी न होणे, अंतिम मंजुरी न झाल्यामुळे विविध बँकांचे पाणीपुरवठा संस्थांनी/शेतकऱ्यांनी काढलेले कर्ज परतफेड करण्यासाठी बँकांकडून सतत तगादा लावण्यात येणे, बँकांनी शेतकऱ्यांच्या जमिनी लिलाव प्रक्रिया करून कर्ज वसुलीची

कार्यवाही सुरू केलेली असणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेले नैराश्याचे वातावरण, अशाप्रकारे शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची गरज व कर्जमाफीला अंतिम मंजुरी देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(सोमवार, दिनांक ७ जुलै, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक-३)**

**(३) सर्वश्री. प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, महेश बालदी, अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अभिमन्यु पवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे लक्ष वेधतील :-**

"खारघर (ता. पनवेल, जि. रायगड) येथील नागरिकांचा सुरूवातीपासूनच दारू विक्रीची दुकाने व दारू पिण्याचे बार यांना खारघरमध्ये सक्त विरोध असणे, बहुतांशी सुशिक्षित नागरिकांची वस्ती असलेला खारघर नोड शैक्षणिक हब म्हणून ओळखला जाऊ लागला असणे, खारघर नोडला दारूमुक्त क्षेत्र (No Liquor Zone) म्हणून पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये सर्वानुमते ठराव मंजूर केला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, खारघरनोड विकसित झाल्यापासून एकही दारू विक्रीचे दुकान उक्त परिसरात अस्तित्वात नसणे, अशा परिस्थितीत शैक्षणिक हब म्हणून ओळखल्या जाणा-या खारघर परिसरात संबंधित विभागामार्फत गोल्डन कॉईन वाईनमार्ट हे नवीन वाईन शॉप से.६ खारघर येथे उघडण्यात आले असणे, खारघर परिसरात दारू बंदी करण्यासाठी तत्कालीन उत्पादन शुल्क मंत्री यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे २५ टक्के नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी केल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी गुप्त पद्धतीने मतदान घेऊन विहित प्रक्रीया पूर्ण करावी असे आश्वासन अधिवेशनाच्या कालावधीत सभागृहात दिले असणे, उक्त परिसरातील स्थानिक लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी अनेक आंदोलने व निवेदने देऊनसुद्धा दारू विक्रीचा परवाना दिल्यावर कोणतीच कारवाई झाली नसणे, त्यामुळे दारू विक्रीचा परवाना दिल्यामुळे खारघर परिसरात वातावरण गढूळ होऊन नागरिकांच्या विशेषत: महिला वर्गाच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून नागरिकांच्या मनात निर्माण झालेल्या प्रचंड असंतोषाबाबत शासनाने खारघर परिसरातील दारू विक्री परवाना रद्द करून दारूमुक्त क्षेत्र (No Liquor Zone) म्हणून घोषित करण्याबाबत तातडीने करावयाची आवश्यक ती कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(४) सर्वश्री. शंकर जगताप, महेश लांडगे, बापूसाहेब पठारे, सुरेश धस, शंकर मांडेकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या १७३.२४ चौ.कि.मी क्षेत्रफळाच्या सुधारित प्रारूप विकास आराखड्यात २८ गावांमध्ये विविध प्रकल्पांसाठी आरक्षणे प्रस्तावित असणे, वाकड, थेरगाव, वाल्हेकरवाडी, काळेवाडी, रहाटणी, रावेत, पिंपळेगुरव भागात नागरी वस्त्यांवर २४, १५, १२ मी. रस्ते, HCMTR, ज्योतिबा उद्यान, क्रीडांगणासाठी आरक्षणे दर्शविणे, अल्पभूधारक नागरिकांच्या घरांवर ही आरक्षणे आल्याने जनतेत तीव्र संताप

निर्माण होणे, मुळा नदीवरील वाकड परिसरात हरित पट्टा, निळ्या-लाल रेषेत असलेल्या गृहप्रकल्पांवर आरक्षण दर्शविणे, पुनावळेतील कचरा डेपो रद्द केल्यानंतरही नागरिकांनी मागितलेल्या जैवविविधता उद्यानाऐवजी SACC प्रशासकीय संकुल आरक्षित करणे, ३० वर्षांपासून HCMTR विकसित न झाल्याने नागपूरप्रमाणे भूमिगत किंवा उन्नत पद्धतीचा पर्याय अमलात आणणे, भूमिपुत्रांच्या जमिनींवर आरक्षणे दाखवून बांधकाम व्यावसायिकांच्या हितसंबंधांना संरक्षण देण्यात येणे, केंद्र, राज्यशासन, शासकीय, पीएमआरडीए, बिल्डर मालकीच्या जमिनी वाचवल्या गेल्या, तर सामान्यांचे नुकसान होण्याची शक्यता असणे, शहरातील शेतकऱ्यांनी प्राधिकरणाला अनेक वर्षांपूर्वी आपल्या जमिनी दिल्या असतानाही उर्वरित शेती करीत असलेल्या शेतकऱ्यांच्या ताब्यात असलेल्या भूमिपुत्रांच्या जमिनीवर विविध प्रकारची आरक्षणे टाकणे, शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या उर्वरित जमिनींवर रिंगरोड, रस्ते, HCMTR आरक्षणे दाखवून बांधकामे धोक्यात येणे, केंद्र, राज्य सरकार, मनपा, शासकीय, पीएमआरडीए, बांधकाम व्यावसायिकांच्या ताब्यातील जमीनींवर आरक्षणे न टाकता विकासाच्या नावाखाली सर्वसामान्य नागरिक व शेतकऱ्यांच्या मूळ जमिनींवर टाकण्यात आलेली आरक्षणे रद्द करण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना व कार्यवाही."

**(५) श्री. बापूसाहेब पठारे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"शांतीनगर, येरवडा (पुणे) विश्रांतवाडी, कळस भागात दरवर्षी पावसाळ्यात अधिकच्या पावसाने पूरस्थिती निर्माण होणे, मागील वर्षी शांतीनगर व इतर परिसरात मुसळधार पावसामुळे गंभीर पूरस्थिती निर्माण होणे, मुळा नदीला आलेल्या पुरामुळे शांतीनगरसह अनेक वस्त्यांमध्ये पाणी शिरणे, विशेषतः शांतीनगरमध्ये घरांमध्ये पाणी घुसल्याने परिस्थिती अत्यंत गंभीर होणे, या आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन दलासह प्रशासनाने तात्काळ शांतीनगरसह एकतानगर, निंबोजीनगर, आदर्शनगर अशा प्रभावित भागांतील सुमारे ६५० नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करणे, सदरचे भाग दाट लोकवस्तीचे असल्याने पूर आल्याने नागरिकांचे प्रचंड नुकसान होणे, कागदपत्रे पाण्यात वाहून/भिजल्याने पुन्हा तयार करण्यासाठी अडचणी येणे, सदरचा भाग हा नदी किनारी असल्याने शांतीनगरसह, कळस, विश्रांतवाडी या भागात कायमस्वरुपी उपाययोजना करणे आवश्यक असणे, नागरीवस्ती लगत पुराचे पाणी वस्त्यांमध्ये शिरु नये यासाठी शासनाने १) नदीकाठच्या भागात पूर प्रतिबंधक भिंती (Retaining/Protection Walls) तातडीने बांधणे २) जलनिकासी व्यवस्था सक्षम करून पाणी साचू नये यासाठी यंत्रणा सुधारणे ३) नागरिकांना सतर्क करण्यासाठी Flood Warning Systems बसवणे ४) दरवर्षी पावसाळ्यापूर्वी नदीपात्राची सफाई व गाळ काढण्याचे नियोजनबद्ध काम केले जाणे ५) सदर भागात तात्पुरती नव्हे तर कायमस्वरूपी पूर प्रतिबंधात्मक योजना आखणे, अशा व इतर कायमस्वरुपी तातडीने करावयाच्या उपाययोजना व शासनाची प्रतिक्रीया."

**(६) श्री. योगेश सागर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई उपनगरातील शासकीय जमिनींवर अतिक्रमण झाल्याच्या आणि अनेक

ठिकाणी अनधिकृत, विनापरवाना बांधकाम केलेच्या तक्रारी प्राप्त असणे, प्रामुख्याने (१) घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड येथील म्हाडाच्या जागेवर नूर-ए-इलाही या मस्जिदीचे अनधिकृत बांधकाम, (२) गेट क्र.५, न्यू कलेक्टर कंपाऊंड, मालवणी, मालाड (प.), न.भू.क्र. २८४१ या जागेवरील अनधिकृत धार्मिक स्थळ, (३) तुबा रेस्टॉरंट, पठाणवाडी, राणी सती रोड, मलाड (ईस्ट) या रेस्टॉरंटचे अनाधिकृत बांधकाम, (४) रोड नं. १६ उपाध्याय नगर एस.आय.डी.सी. मेट्रो स्टेशन, एमआयडीसी येथील अनधिकृत बांधकाम, (५) पायलीपाडा येथील B.A.R.C. च्या संरक्षण भिंतीलगत अनधिकृत धार्मिक स्थळ, (६) साई बाबा नगर, धारावी येथील अनधिकृत धार्मिक स्थळ, (७) नाईक नगर, धारावी येथे अनधिकृत धार्मिक स्थळ, सदर प्रकरणांमध्ये वारंवार पाठपुरावा करुनही अद्यापपर्यंत सदर अतिक्रमणांवर, अनधिकृत बांधकामांवर कारवाई न झाल्याची स्थानिकांची तक्रार असणे, सदर प्रकरणात आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई पोलीस आयुक्त, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांची उच्चस्तरीय समिती स्थापन करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

**(७) श्री. रईस शेख, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अल्पसंख्याक विकास आणि औकाफ मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील अल्पसंख्याक समाजातील अनेक समस्या प्रलंबित असणे, तसेच उर्दू अकादमीचे कार्यालय १९९६ पासून दक्षिण मुंबईतील फोर्ट परिसरातील “ओल्ड कस्टम हाऊस” मधील सांस्कृतिक कार्य विभागाच्या जागेत सुरु असलेल्या अकादमीच्या कार्यालयास अमूस, सांस्कृतिक कार्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५ एप्रिल, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत उर्दू अकादमीचे कार्यालय भाड्याच्या जागेत स्थलांतर करण्याचा झालेला निर्णय, सदर निधीमध्ये किमान ५ कोटीची आवश्यकता असणे, २०२३-२४ मध्ये २ कोटी तरतूद असताना १६ लाख निधी प्राप्त असणे, त्याचबरोबर अकादमीची ७ पैकी ४ पदे रिक्त असणे, एकाही सदस्यांच्या नियुक्त्या झालेल्या नसणे, अल्पसंख्याक विकास विभागाच्या अधिपत्याखालील ७ विभागामध्ये ६०९ पदे मंजूर ६७ टक्के रिक्त पदे, मनुष्यबळाअभावी योजनांची अंमलबजावणी न होणे, लाभार्थी निवड रखडणे, शुन्य टक्के निधी खर्च न होणे, तसेच राज्यात एकूण मालमत्तापैकी वक्फ च्या ६० टक्के जमिनीवर झालेले अतिक्रमण, समाजाला कब्रस्तानासाठी जागा उपलब्ध नसणे, वक्फ मंडळाच्या बळकटी करणासाठी दरवर्षी मिळणाऱ्या निधीतून होणारी कामे समाजाला न मिळणे, जिल्हा समित्या बनवल्या जाणे परंतु वक्फ न्यायाधिकरणाला अपुरे मनुष्यबळ असणे, राज्यातील वक्फ मालमत्तांचे जीआयएस, “डॅश बोर्ड” तयार करणे, नवे संकेतस्थळ, मंडळाने घेतलेल्या सर्व निर्णयाची माहिती संकेतस्थळावर देणे, मंडळाच्या अतिक्रमित मालमत्ताधारकांची नावे जाहिर करणे, आदि संदर्भात अल्पसंख्याक लोकप्रतिनिधी संबंधितांकडे पत्रव्यवहार करुन मागणी करुनही दुर्लक्ष होणे, तसेच अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (एमआरटीआय) स्थापनेपासून ५ महिने ठप्प राहिलेली पदनिर्मिती व प्रशिक्षण योजनेच्या कामांना गती देण्याबाबत होत असलेला विलंब, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यावर्षी उर्दू अकादमी सुवर्ण महोत्सव साजरा करित असतांना

अकादमीची शासकीय जागेतून हकालपट्टी करण्याचे आदेश पारित करुन एक प्रकारे अवहेलना करणे, उक्त फोर्ट परिसरातील “ओल्ड कस्टम हाऊस” मध्ये जाती धर्माची अकादमीच्या कार्यालयाची दालने वाटप करण्यात असताना उर्दू अकादमीवर भाड्याच्या जागेत स्थलांतर करणे, सांस्कृतिक कार्य विभागाकडून सापत्न वागणूक देणे, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून शासनस्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका."

**(८) श्री. किशोर पाटील, वि. स. स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. जळगांव बँकेने चालू वर्षापासून नियमित कर्जफेड करणाऱ्या सभासदांना अल्प मुदत थेट कर्ज पुरवठा करणे, परंतु यंदा जळगांव जिल्ह्यात राहत असलेल्या शेतकरी सभासदांच्या जमिनी छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, धुळे या जिल्ह्या लगत असलेल्या गावात असणे, तसेच पाचोरा-भडगांव मतदार संघातील जिल्ह्यातील हद्दीवर येत असलेली गावे सातगाव डोंगरी, गहूले, निपाणे, मोहलाई, पिंपळगांव हरे येथील शेतकऱ्यांचे जमिनीचे क्षेत्र हे लगतच्या जिल्ह्यामध्ये येत असल्यामुळे त्या शेतकऱ्यांना पीककर्ज घेण्यास अडचणी निर्माण होणे, वर्षानुवर्षे जिल्हाबाहेरील लगतच्या क्षेत्र असलेल्या शेतकरी सभासदांना जिल्हा बँक कर्ज देत असतांना अचानकपणे सदरील निर्णय घेण्यात आल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १९ एप्रिल, २०२५ रोजी लेखी निवेदन देण्यात येणे, परंतु अद्यापही या संदर्भात कोणताच निर्णय न झाल्याने या शेतकरी सभासदांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका."

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : अभिनंदनपर प्रस्ताव -**

"माननीय न्यायमूर्ती श्री. भूषण रामकृष्ण गवई यांची भारताच्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदनपर प्रस्ताव."

**तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **संसदीय कार्य मंत्री** : महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२५ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात दिनांक ०३ मार्च, २०२५ ते दिनांक २६ मार्च, २०२५ या कालावधीत मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण ९४२

आश्वासनांची यादी तसेच, सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, आतापर्यंत पूर्तता करण्यात आलेल्या एकूण १७२ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह सभागृहासमोर ठेवतील.

(२) **माहिती तंत्रज्ञान मंत्री** : राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(३) **परिवहन मंत्री** : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा हिशेब व हिशेब तपासणी अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(शुक्रवार, दिनांक ४ जुलै, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक- १)**

(१) **श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नाशिक महानगरपालिका अंतर्गत ठेकेदारीवर विविध कामांसाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणे, सदर कर्मचाऱ्यांची फसवणूक ठेकेदाराकडून करण्यात येणे, या कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदे अंतर्गत वेतन देणे गरजेचे असताना त्यांच्या खात्यातून बेकायदेशीरपणे रक्कम काढून घेणे, सदर काढून घेतलेल्या रकमेचा वापर भ्रष्टाचारासाठी केला जाणे, भारताच्या संविधानाने तक्रार करण्याचे कर्मचाऱ्यांना दिलेले अधिकार ठेकेदाराकडून काढून घेण्यात येणे, नोकरीची गरज असल्यामुळे कर्मचाऱ्यांकडून स्टॅम्प पेपरवर स्वाक्षरी करून घेणे, अशा प्रकारे कोऱ्या स्टॅम्प पेपरवर सही करून घेणे बेकायदेशीर असताना देखील नाशिक महानगरपालिका अधिकाऱ्यांचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, संघटीतपणे भ्रष्टाचार करण्यासाठी व महानगरपालिकेची लूट करण्यासाठी ठेकेदार व अधिकारी यांच्याकडून सुरू असणारी कार्यवाही, याबाबत कामगार विभाग व पोलीस विभाग यांचे होत असलेले दुर्लक्ष, सदर भ्रष्टाचार थांबविण्यासाठी भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल करून कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे पोलीस प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रीया."

(२) **सर्वश्री. अमोल पाटील, चंद्रकांत (निंबा) पाटील वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मौजे रिंगणगाव तालुका एरंडोल येथे दिनांक १६ जून, २०२५ रोजी सायंकाळी

बेपत्ता झालेल्या तेरा वर्षीय तेजस चा मृतदेहच दुसऱ्या दिवशी सकाळी गावालगत काटेरी झुडपात आढळणे, तेजसने हार्डवेअरचे दुकान सायंकाळी सात वाजता बंद करून बिर्याणी खाण्यासाठी जाताना शेतात काम करणाऱ्या परप्रांतीयांच्या मागे जाताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद होणे, तेजसच्या खुनाच्या घटनेमुळे संतप्त झालेल्या नागरिकांचे तीव्र पडसाद उमटणे, राज्यभरात या घटनेवर तीव्र प्रतिक्रिया उमटत असणे, रिंगणगाव गावातील गावकऱ्यांनी मोर्चा काढणे, हत्या करणाऱ्या मारेकऱ्यांना फाशीच्या शिक्षेची मागणी करणे, तेजसच्या कुटुंबियांकडून माननीय मुख्यमंत्री महोदयांना निवेदन देखील देण्यात आलेले असणे, तेजसचा खून हा नरबळीचा प्रकार असल्याचे कुटुंबियांकडून सांगण्यात येणे, या प्रकरणातील अटक करण्यात आलेले आरोपी खोटे बोलत असून पोलीस प्रशासन त्यावर विश्वास कसा ठेवतात असा प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केला जाणे, या निरागस बालकाच्या हत्येची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी होत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(३) श्री. अमित साटम, ॲड. पराग अळवणी, श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई उपनगरातील अंधेरी पश्चिम येथील डी. एन. नगर येथे एअरपोर्ट अथॉरिटीच्या जमीनीवर असलेल्या ट्रान्समिशन टॉवर्सच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये पुनर्विकासासाठी हाईट रिस्ट्रीक्शन व निर्बंध असणे, यामुळे डी.एन. नगर व गुलमोहोर या परिसरातील विकास खोळंबलेला असणे, अनेक मध्यमवर्गीय कुटुंबे गेल्या ४० ते ५० वर्षापासून राहत असलेल्या इमारती जीर्ण झालेल्या असणे, सदर निर्बंधामुळे पुनर्विकासाचा खोळंबा झालेला असणे, सदर निर्बंधामुळे येणाऱ्या नजीकच्या काळामध्ये मध्यमवर्गीय कुटुंबे राहत असलेल्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत असे घोषीत करण्यात आले तर रस्त्यावर येण्याची शक्यता असणे, सदर जमिनीवर असलेले ट्रान्समिशन टॉवर इतरत्र हलवून डी.एन.नगर व गुलमोहोर परिसरामध्ये असलेला हाईट रिस्ट्रीक्शन व निर्बंध हटवण्याची आवश्यकता असणे, सदर इमारतींचा पुनर्विकास होत नसल्यामुळे शासनाचा ही महसूल बुडत असणे, डी.एन. नगर व गुलमोहोर परिसर या आजूबाजूच्या परिसरामध्ये असलेला हाईट रिस्ट्रीक्शन व निर्बंध हटवण्याबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२५ मध्ये शासनाने पावसाळी अधिवेशनाच्या अगोदर सदर विषयाचा निर्वाळा करण्याचे आश्वासन दिलेले असूनही अद्याप पर्यंत सदर विषयांमध्ये कोणतीही प्रगती झाली नसणे, सदर विषय हा गेली पाच वर्ष प्रलंबित असल्यामुळे सदर परिसरातील नागरीक बेघर होण्याची वेळ येत असल्यामुळे लोकांमध्ये शासनाबाबत तिव्र संतापाची भावना निर्माण झालेली असणे, सदर विषयावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(४) श्री. प्रकाश सोळंके, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"माजलगाव पाटबंधारे विभाग, परळी वै., जि. बीड अंतर्गत सन २०२४-२५ मध्ये ५ कोटी किंमतीच्या विविध कामांची १० लक्ष रूपयांच्या मर्यादेत देखभाल दुरूस्ती अंतर्गत प्रापण सूची मंजुर होणे, सदर सूची मध्ये कामे प्रस्तावित करताना कार्यकारी अभियंता यांनी आवश्यक नसताना आर्थिक गैरव्यवहार करण्याच्या हेतुने अनेक बोगस कामे प्रस्तावित करणे, तसेच मूळ काम झालेले नसताना देखभाल दुरूस्तीच्या नावाने कामे प्रस्तावित करणे, मंजुर झालेली कामे वाटप करताना सुशिक्षित बेकार अभियंता, मजूर संस्था व खुली निविदा (३३:३३:३३) चे प्रमाण न राखता सर्व कामे मजूर संस्थांना वाटप करणे, एकंदरीत कार्यकारी अभियंता यांनी चुकीची कामे प्रस्तावित करणे, चुकीच्या पद्धतीने कामे वाटप करणे, या मध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता करणे, बोगस कामे दाखऊन आर्थिक गैरव्यवहार करणे, याबाबत मुख्य अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत स्वतंत्र चौकशी करून दोषी कार्यकारी अभियंता व इतर अधिकारी यांच्या विरूद्ध कारवाई करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(५) सर्वश्री. प्रविण दटके, प्रताप अडसड, सुनिल कांबळे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मौजे कोंदेगाव, ता. सावनेर, जि. नागपूर येथील गाव हद्दीतील झुडुपी सर्व्हे नं. ६३ व ६४ ही जमीन वन विभागाची असणे, सदर वन विभागाच्या शासकीय जमिनीवर शासनाची कोणतीही परवानगी न घेता अतिक्रमण करुन धार्मिक शैक्षणिक संस्थेचे बांधकाम केलेले असणे, या संस्थेमध्ये परप्रांतातील लहान मुलांना शस्त्रास्त्र व हिंसाचाराचे शिक्षण देत असल्याने सदर अतिक्रमण निष्कासन करुन संबंधितांवर कडक कारवाई करण्याचा विनंती अर्ज ग्रामपंचायत कार्यालय, कोंदेगाव यांनी जिल्हाधिकारी, नागपूर, तहसिलदार व उप विभागीय अधिकारी, सावनेर, मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांना दिलेला असणे, या गंभीर प्रकरणामुळे स्थानिक भागातील शांतता व सुव्यवस्था धोक्यात येण्याची शक्यता असणे, या भागात हिंसाचाराची शक्यता असणे, अशा प्रकारे वन जमिनीवर होणाऱ्या अतिक्रमणांमुळे महाराष्ट्रातील वनक्षेत्र दिवसेंदिवस कमी होत असणे, कोंदेगाव ग्रामपंचायत या शासकीय आस्थापनेने सदर गंभीर प्रकरणाबाबत वरीष्ठ कार्यालयांकडे विनंती अर्ज करुन देखील अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई न होणे, या प्रकरणातून अतिक्रमण निष्कासन व अवैध कृत्ये यावरील कार्यवाहीबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांची अनास्था दिसून येणे, सदर प्रकरणात कालबद्ध निष्कासन कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) ॲड. श्रीजया चव्हाण, श्री. जितेश अंतापुरकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-**

"नांदेड जिल्ह्यात गोदावरी नदीवर बाभळी बंधारा असणे, यातून पुढे जाणारे पाणी तेलंगणा राज्यातील श्रीराम सागर धरणामध्ये जमा होणे, या पाण्यासंदर्भात

मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल दाव्यात दिनांक २८ फेब्रुवारी, २०१३ रोजी आदेश देताना मा. सर्वोच्च न्यायालयाने बंधाऱ्याचे दरवाजे दरवर्षी १ जुलै ते २८ ऑक्टोबर या कालावधीत उघडे ठेवण्याचे निर्देश देणे, त्यानुसार १ जुलै ते २८ ऑक्टोबर या दरम्यान बाभळी बंधाऱ्यातून पाणी सोडण्यात येणे, मात्र श्रीराम सागर धरण अनेकदा अगोदरच भरणे, तरीही मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांमुळे बंधाऱ्याचे दरवाजे २९ ऑक्टोबरच्या अगोदर बंद करता येत नसल्याने पाणी समुद्रात वाहून जाणे, त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयात तेलंगणा राज्याच्या सहमतीने अथवा स्वतंत्र अर्ज करुन व वस्तुस्थिती न्यायालयाच्या लक्षात आणून देऊन दिनांक २८ फेब्रुवारी, २०१३ च्या आदेशात बदल करण्याचे आणि श्रीराम सागर धरणातील पाणीसाठा लक्षात घेऊन दरवाजे बंद करण्याकरीता सुधारित आदेश घेतल्यास पाणी वाचणे, पर्याय म्हणून बाभळी धरणाच्या दरवाजांची उंची कमी केल्यासही वाया जाणारे पाणी वाचविता येऊ शकणे, मात्र राज्य शासनाकडून त्या दृष्टीने कोणतीही कार्यवाही न करणे, यामुळे स्थानिक जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष आणि नाराजी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(७) श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे दिव्यांग कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील दिव्यांग व मतिमंद मुला मुलींच्या शाळा २००२ च्या पूर्वीच्या असणे यापैकी १२३ शाळा या "अ" श्रेणीतील असणे व ३५ शाळा या "ब" श्रेणीतील असणे, "अ" श्रेणीतील १२३ शाळांना दिनांक ८ एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयानुसार शंभर टक्के अनुदान देण्याचे ठरविण्यात आले असणे पण दिनांक ६ नोव्हेंबर २०१८ च्या शासन निर्णयानुसार पद मान्यता व ५० टक्के शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना अनुदान देण्यात येत असणे, मागील दहा वर्षापासून हे सर्व कर्मचारी ५० टक्के पगारावरती काम करीत असणे, मागील अनेक वर्षापासून या १२३ शाळेतील कर्मचारी हे शंभर टक्के अनुदानाची मागणी करीत असणे, दिनांक ६ जून, २०२५ ला आयुक्त दिव्यांग कल्याण विभाग, पुणे द्वारा शासनास शंभर टक्के अनुदानाचा प्रस्ताव सादर करण्यात आला असणे, पण शासनाने सदर प्रस्ताव प्रस्ताव हा आयुक्त दिव्यांग कल्याण यांना दिनांक १७ जून, २०२५ ला परत पाठविला असणे व राज्यस्तरीय तपासणी समितीद्वारा मान्यतेने सादर करण्यात यावे असे कळविले असणे, यावरून असे निदर्शनास येणे की आयुक्त व शासन हे १२३ शाळा "अ" श्रेणीतील व ३५ शाळा "ब" श्रेणीतील १००% अनुदानावर आणण्याकरिता उचित कार्यवाही होत नसणे, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(८) श्री. राजेश बकाने, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या बोगस व उगवण क्षमते अभावी अयशस्वी ठरत असलेल्या सोयाबीन बियाण्यांच्या विक्रीबाबत वर्धा जिल्ह्यातील शेतकरी त्रस्त असल्याचे माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास आले असणे, यामध्ये मे. वरूण सिड्स

अँड अँग्रोटेक (इंडीया) प्रा.लि. हैद्राबाद या कंपनीचे श्री गणेशा सोयाबीन असणे, बोगस व उगवण क्षमतेबाबत अनेक तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी चौकशी करून दोषी अधिकारी व कंपनीवर कारवाई करण्याची मागणी करणे, यावर शासनाने तात्काळ दखल घेऊन करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रीया."

**सहा : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ** :-

**(१)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७६ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुर्नविकास) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

**(२)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (सुधारणा) विधेयक, २०२५

---

**(ब) विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे विचार, खंडश: विचार व संमत करणे** :-

(१) (क) **सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग विधेयक, २०२५**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव** :-

"सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री.साजिद पठाण, रामदास मसराम व हेमंत ओगले, वि.स.स. यांचा प्रस्ताव** :-

"सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) (क) **सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग विधेयक, २०२५**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री.साजिद पठाण, रामदास मसराम व हेमंत ओगले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(क) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(१)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७३ - महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२५

**(२)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७४ - महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५

**(३)** **(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२५ नापसंत करते."

(ख) **सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७५ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम,**

**सर्वश्री.साजिद पठाण, रामदास मसराम व हेमंत ओगले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७५ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

सात : **(सोमवार, दिनांक ७ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, सुनिल प्रभू, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. दिलीप सोपल, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पाटील, अजय चौधरी, अमित देशमुख, रोहित पवार, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अमीन पटेल, उत्तमराव जानकर, कैलास घाडगे-पाटील, अस्लम शेख, नितीन देशमुख, सुनिल राऊत, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री संजय पोतनीस, बापूसाहेब पठारे, वरुण सरदेसाई, अमित झनक, अनंत (बाळा) नर, अभिजीत पाटील, हारुन खान, शिरीषकुमार नाईक, सिध्दार्थ खरात, संदिप क्षिरसागर, नारायण पाटील, गजानन लवटे, विकास ठाकरे, महेश सावंत, मनोज जामसुतकर, साजिद खान पठाण, प्रविण स्वामी, संजय मेश्राम, रामदास मसराम, संजय देरकर, बाबाजी काळे, हेमंत ओगले, डॉ. ज्योती गायकवाड, श्री.अनिल मांगुळकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्याचे कृषी मंत्री सिन्नर तालुक्यात नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करताना त्यांनी" ढेकळांचे पंचनामे करायचे का ?" असे शेतकऱ्यांच्या भावना दुखावणारे केलेले वक्तव्य, जालना जिल्ह्यातील परतूर विधानसभा मतदार संघात" हर घर सौर" योजनेवरील एका कार्यक्रमात सत्तारुढ पक्षाच्या एका विधीमंडळ सदस्याने " आपल्यामुळे कपडे, बुट, मोबाईल योजनांचे आर्थिक फायदे आणि पेरणी करण्यासाठी पैसे मिळतात" असे शेतकऱ्यांना उद्देशून उद्गार काढणे, मे, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यामध्ये राज्यातील सर्वच भागात वादळी वाऱ्यासह मुसळधार झालेला पाऊस, त्यामुळे अनेक जिल्ह्यात निर्माण झालेली पूरपरिस्थिती, नद्यांचे पाणी पात्राबाहेर जाणे, अनेक ठिकाणी दरडी कोसळून विस्कळीत झालेली वाहतूक, केळी, पेरु, द्राक्ष, डाळींब इत्यादी फळपिकांचे झालेले मोठे नुकसान, राज्य सरकारने नुकसानीबाबत पंचनामे त्वरित करणे व शेतकऱ्यांना दर हेक्टरी ५० हजार रुपयांची नुकसान भरपाई देण्याची मागणी, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई वाटपात विविध जिल्ह्यात झालेले भ्रष्टाचार, मे महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कोकणातील मासेमारी बंद राहिल्याने मच्छिमारांचे झालेले नुकसान, दरवर्षी मे, महिन्यात कोकणात पर्यटक मोठ्या प्रमाणावर येत असतात, परंतु यावर्षी अतिवृष्टीमुळे पर्यटकांची संख्या कमी होणे व पर्यटन व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या पर्यटन व्यावसायिकांचे झालेले अतोनात नुकसान, दरवर्षी कोकणात

साधारणपणे २३ मे पासून भात आणि नागलीची पेरणी सुरु होते, परंतु यावर्षी १५ मे पासूनच पावसाला सुरुवात झाल्यामुळे पेरणी पूर्वीची कामे न होणे, तसेच रायगड जिल्ह्यात रब्बी हंगामातील पिकांच्या कापणीची कामे सुरु असतांनाच पाऊस सुरु झाल्याने भात मातीत मिसळून पूर्णपणे वाया जाणे, कोकणातील सदरहू परिस्थिती पाहता कोकणातील शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करण्याकरिता शासनाने विशेष मदतीचे पॅकेज जाहीर करण्याची लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करण्याची आवश्यकता, कांदा उत्पादक शेतकऱ्यांची होत असलेली पिळवणूक, राज्य शासनाने कृषि क्षेत्राला अग्रेसर ठेवण्यासाठी महाॲग्रो एआय धोरणास (२०२५ ते २०२९) शासनाने दिलेली मंजूरी, एका रुपयांत पीक विमा योजना बंद करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, शेतकऱ्यांना कृषी विम्याची रक्कम दिली जात नसून विमा कंपन्यांना कृषि विम्याचा लाभ झाला असणे, संपूर्ण राज्यात बोगस बीटी बियाण्याचा धुमाकूळ सुरु असून यावर्षी बोगस बीटी बियाणे ३० टक्क्यापेक्षा जास्त विकले गेल्याची बाब निदर्शनास येणे, बिटी बियाणांची बिनधास्त विक्री सुरु असून त्यांचे बिंग फुटू नये म्हणून बियाणे लेबलविना, खुल्या पाकिटमध्ये विकले जात असणे, शासनाने शेतकऱ्यांना कर्जमाफीची घोषणा निवडणूकी अगोदर केली असून अद्यापही सरसकट कर्जमाफीची घोषणा न करणे, कापसाच्या पालवीवर वाणी नावाचा रोग आला असून त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होणे, तसेच शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या धानाचे पैसेही अद्याप मिळालेले नसणे, दि. १ जानेवारी ते ३१ मार्च, २०२५ या तीन महिन्यांच्या कालावधीत विदर्भ व मराठवाड्यातील २६७ शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या बऱ्याच कुटुंबियांना अद्यापही आर्थिक मदत न मिळणे, विदर्भातून गोव्याला जाण्यासाठी ८६ हजार कोटी रुपयांचा शक्तिपीठ महामार्ग करण्याची आखलेली योजना, वास्तविक पाहता या अंतर्गत असलेल्या मंदिरांकडे जाण्यासाठी तयार असलेल्या उत्तम रस्त्यांचे जाळे, शक्तिपीठ महामार्गामध्ये १२ जिल्ह्यातील शेतकरी बाधित होणार असल्याने दिनांक १.७.२०२५ पासून १२ जिल्ह्यात व संपूर्ण महाराष्ट्रात रास्तारोको आंदोलन शेतकऱ्यांकडून करण्यात येणे, सदर प्रकल्पाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या काढून घेण्यात येणाऱ्या सुपिक जमिनी या मार्गासाठी लाखो झाडांची होणारी कत्तल व पर्यावरणाचा होणारा ऱ्हास, यासाठी राज्य शासनाने नुकतीच २० हजार कोटीची तरतूद करणे व शेतकऱ्यांच्या विरोध असतांनाही दडपशाही करुन शेतकऱ्यांच्या जमिनी शक्तीपीठ महामार्गासाठी घेतल्या जाणार असणे, दिनांक २५ व २६ जून, २०२५ रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर व लोणार तालुक्यातील समृद्धी महामार्ग वाहून जाणे, सदर मुसळधार पावसामुळे सोलार पंपासह संपूर्ण सेट, पाईप लाईन, स्प्रिंकलर सेट, केबल इत्यादी वाहून जाणे, सिबिलची अट व ओटीएस ची अट केल्यामुळे बँकेतर्फे शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज न मिळणे, तसेच राज्य शासनाने नोकरभरतीमध्ये कंत्राटी भरती केली असून कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्याच्या अनुषंगाने वेतन मिळालेले नसणे, लिपिकाला १२ हजार, शिपायांना १० हजार इतका तुटपुंजा पगार दिला जाऊन एजन्सीला जास्तीत जास्त फायदा कमवून दिला जाणे, राज्याला प्रगतीपथावर नेण्यासाठी कर्तव्यदक्ष आणि स्वच्छ प्रतिमेचे अधिकारी देण्याची जबाबदारी असलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) सदस्य पदी वादग्रस्त कारकीर्द राहिलेले विशेष पोलीस महानिरिक्षक दिलीप भुजबळ यांची नियुक्ती करण्यात येणे, त्यामुळे कामगारांची व

बेरोजगारांची फसवणूक केली जात असणे, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही."

**आठ : सर्वश्री रणधीर सावरकर, अर्जुन खोतकर, अब्दुल सत्तार, सुधीर मुनगंटीवार, दिलीप वळसे-पाटील, दिपक केसरकर, सुरेश धस, धनंजय मुंडे, रमेश बोरनारे, प्रशांत बंब, संजय बनसोडे, राजेंद्र गावित, संभाजी निलंगेकर-पाटील, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री चेतन तुपे, नारायण कुचे, शांताराम मोरे, शेखर निकम, बबनराव लोणीकर, किशोर पाटील, प्रकाश सोळंके, अभिमन्यू पवार, निलेश राणे, महेश शिंदे, गोपीचंद पडळकर, अनिल पाटील, चंद्रदिप नरके, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री संजय गायकवाड, राजकुमार बडोले, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री नरेंद्र भोंडेकर, चंद्रकांत सोनवणे, सर्वश्रीमती श्वेता महाले, मंजुळा गावित, श्री. प्रताप पाटील-चिखलीकर, डॉ. संजय कुटे, श्री. राजेश क्षिरसागर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री प्रकाश भारसाकळे, महेंद्र दळवी, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री हरिष पिंपळे, महेंद्र थोरवे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री प्रवीण दटके, किरण सामंत, दिलीप बनकर, देवराव भोंगळे, संतोष बांगर, बालाजी कल्याणकर, डॉ. किरण लहामटे, श्रीमती सीमाताई हिरे, सर्वश्री चंद्रकांत पाटील, विलास तरे, हिरामण खोसकर, रमेश कराड, अमोल पाटील, चंद्रकांत नवघरे, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री सुहास कांदे, अमोल खताळ, डॉ. तुषार राठोड, सर्वश्री विठ्ठल लंघे, राजेश पवार, बाबुराव कदम-कोहळीकर, आनंद तिडके, राणाजगजितसिंह पाटील, हिकमत उढाण, राजेंद्र यड्रावकर-पाटील, विक्रम पाचपुते, राजेश मोरे, विजय शिवतारे, ॲड. राहुल कुल, डॉ. तानाजी सावंत, श्री. सुहास बाबर, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री सत्यजित देशमुख, शंकर मांडेकर, सुभाष देशमुख, अनुपभैय्या अग्रवाल, काशिराम पावरा, विजय देशमुख, दिलीप बोरसे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री महेश लांडगे, मंगेश चव्हाण, प्रताप अडसड, प्रविण तायडे, राजू तोडसाम, समीर कुणावार, राजेश वानखडे, राजेश बकाने, विनोद अग्रवाल, विजय रहांगडाले, किशोर जोरगेवार, डॉ. मिलिंद नरोटे, श्रीमती सई डहाके, सर्वश्री श्याम खोडे, आमश्या पाडवी, श्रीमती रंजनाताई जाधव, सर्वश्री शरद सोनवणे, उमेश यावलकर, किसन वानखेडे, कृष्णा खोपडे, किर्तीकुमार भांगडिया, तान्हाजी मुटकुळे, श्रीमती अनुराधा चव्हाण, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री जितेश अंतापुरकर, करण देवतळे, चरणसिंग ठाकूर, सुधीर गाडगीळ, अमल महाडिक, हेमंत रासने, सुनिल कांबळे, मनोज घोरपडे, सचिन कल्याण-शेट्टी, शंकर जगताप, राजेश पाडवी, डॉ. आशिष देशमुख, श्री. राघवेंद्र पाटील, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री चैनसुख संचेती, केवलराम काळे, संजय पुराम, समीर मेघे, संतोष दानवे, भिमराव तापकीर, भिमराव केराम, अमोल जावळे, रत्नाकर गुट्टे, सिध्दार्थ शिरोळे, राहुल आवाडे, देवेंद्र कोठे, डॉ. विजयकुमार गावित, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री मोहन**

**मते, किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, शिवाजी पाटील, काशिनाथ दाते, विजयसिंह पंडित, ज्ञानेश्वर कटके, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र केंद्रस्थानी ठेऊन राज्यात सिंचन क्षेत्राकडे विशेष लक्ष देण्याचा शासनाचा प्रयत्न असणे, कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमता (ए-आय) तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे धोरण अंमलात आले असणे, जलयुक्त शिवार योजना, नदीजोड प्रकल्प आणि रखडलेल्या सिंचन योजनांच्या माध्यमातून कृषी सिंचन वाढविण्यावर भर देण्यात आला असणे, विदर्भातील वैनगंगा-पैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प पूर्ण झाल्यास १० लाख एकर जमीन ओलिताखाली येण्याची शक्यता असणे, नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पामुळे नाशिक व जळगाव जिल्ह्यातील ४९,५१६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार असणे, दमणगंगा-एकदरे-गोदावरी या २३०० कोटी रुपये किंमतीच्या नदीजोड प्रकल्पामुळे ३.५५ टीएमसी पाणी उपलब्ध होणार असणे, तापी महापुनर्भरण या १९,३०० कोटी रुपये किंमतीच्या सिंचन प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम विदर्भातील खारपाण पट्ट्यातील शेतकऱ्यांना लाभ होणार असणे, महाकृषी विकास अभियान अंतर्गत केवळ १ रुपयात राबविण्यात येणाऱ्या पिक विमा योजनेत नियमितता ठेवण्याच्या दृष्टीने कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी अधिक सतर्क होण्याची आवश्यकता, अटल भूजल योजना अधिक गतीमान करण्याची आवश्यकता, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ ला मंत्रीमंडळाची मान्यता मिळणे, कोकणातील उल्हास आणि वैतरणा नद्यांच्या खोऱ्यातून ५४.७० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा प्रकल्प प्रस्तावित असणे, राज्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्त्वाचे पांदण रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पांदण रस्ते योजना" अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, राज्यात सन २०२४-२०२५ च्या हंगामांतर्गत सोयाबीन, तूर, ज्वारी, चना, कापूस इ. धान खरेदी झाली असणे, शासकीय खरेदी योजनेतील अनियमितता टाळण्यासाठी योजना सक्षम करण्याची आवश्यकता, राज्यात काही गावांतील शेतकऱ्यांना डिजिटल पध्दतीने देण्यात येणारे लाभ मिळण्यात असलेल्या अडचणी दूर करण्याची आवश्यकता, 'मॅगनेट २.०' अंतर्गत कृषी व्यवसायाला चालना देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्यात आली असणे, ऊर्जा वापराला प्रोत्साहन देतानाच ऊर्जा निर्मितीवर भर देण्यात येत असणे, १६००० मेगावॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पांना गती देण्याचे धोरण आखण्यात येणे जेणेकरुन, शाश्वत व स्वच्छ ऊर्जा मिळेल आणि औद्योगिक क्षेत्राला त्याचा फायदा होईल, राज्यातील सर्व शासकीय इमारती सन २०२५ या वर्षाच्या अखेरपर्यंत संपूर्णपणे सौरऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे धोरण असणे, शेतकऱ्यांना सिंचनासाठी सौर कृषीपंप उपलब्ध करून देणारी "मुख्यमंत्री सौर कृषी योजना" राज्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असणे, सौर ऊर्जेचा वापर वाढवून शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे उद्दिष्ट असणे, महाराष्ट्र देशासाठी रोल मॉडेल व्हावे व राज्यातील शेतकरी सुजलाम-सुफलाम व्हावा यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

**नऊ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(गुरुवार, दिनांक ३ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली अर्धा-तास चर्चेची सूचना (सूचना क्र. १)**

**(१) श्री.मनोज जामसुतकर, वि.स.स.**

"राज्यातील अनेक जिल्ह्यांत बिबटे व वाघांचे होणारे मृत्यू रोखण्याबाबत" यावरील श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७५० ला दिनांक ०६ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.**

"राज्यातील सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही (CCTV) कॅमेरे बसविण्याबाबत" या विषयावरील श्री.विजय वडेट्टीवार व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७२५१ ला दिनांक ०२ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(३) श्री.मोहन मते, वि.स.स.**

"जव्हार (जि. पालघर) नगर परिषदेतील विकास कामांना तांत्रिक मान्यता न देता शासकीय निधीचा केलेला अपहार" या विषयावरील श्री.मंगेश कुडाळकर व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २६९ ला दिनांक ०७ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(४) श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

"राज्यात जल जीवन मिशन योजनेंतर्गत पाणीपुरवठा करणेबाबत" या विषयावरील श्री.राहुल आवाडे व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७०८९ ला दिनांक ०३ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ७ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा.